मंत्री आस्थापनेवर ३० जनसंपर्क अधिका-यांची काल्पनिक पदे निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : एमआयएन १२१७/प्र.क्र.२४२ /२१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ जानेवारी, २०१८.

प्रस्तावना:

वर्तमानपत्र/इलेक्ट्रॉनिक मिडीया व विविध प्रसारमाध्यमाद्वारे शासकीय योजनांना प्रसिध्दी, माध्यमांकडे खुलासा इ. कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक मंत्रालयीन आस्थापनेवर १ जनसंपर्क अधिकारी असे ३० विभागांकरिता एकूण ३० जनसंपर्क अधिका-यांची प्रत्येकी दरमहा रु.२५०००/- इतक्या मानधनावर काल्पनिक पदे प्रथमतः दोन वर्षाकरीता मंत्रालयीन आस्थापनेवर निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

वर्तमानपत्र/इलेक्ट्रॉनिक मिडीया व विविध प्रसारमाध्यमांद्वारे शासकीय योजनांना प्रसिध्दी, माध्यमांकडे खुलासा इ. बाबींची कार्यवाही करण्यासाठी मंत्री आस्थापनेवर ३० जनसंपर्क अधिका-यांची प्रत्येकी दरमहा रु.२५०००/- इतक्या मानधनावर काल्पनिक पदे प्रथमतः दोन वर्षाकरीता किंवा मंत्री मंडळाचा कालावधी संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तिथपर्यंत निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. जनसंपर्क अधिका-यांना प्रत्येकी दरमहा रु.२५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतके मानधन देण्यात येईल.

३. जनसंपर्क अधिकारी म्हणून मंत्री आस्थापनेवर नियुक्तीकरिता निवड प्रक्रीया, शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा, अनुभवाची पात्रता, मंत्री आस्थापनेवर करावयाची कामे इ. बाबत सामान्य प्रशासन विभागाच्या ३४-अ कार्यासनाकडून स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

४. मंत्री आस्थापनेवरील निर्माण करण्यात आलेली जनसंपर्क अधिका-यांच्या काल्पनिक पदांवरील मानधनाचा खर्च हा मा. मंत्री यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी वृंदावरील वेतन, प्रवास खर्च व कार्यालयीन खर्च "मागणी क्र. ए-४ - २०५२, सचिवालय सर्वसाधारण सेवा (००) (०३), मंत्र्यांचा स्वीय कर्मचारी वर्ग (२०५२००३४), " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६१७/आपुक, दि.१४.११.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२९१७००३२०९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

Somnath Namdeo Bagul

Digitally signed by Somnath Namdeo Bagul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b01714c1480a47cec5943a1c3c73ea95af0534418cf92d1ac844331c4116879d, cn=Somnath Namdeo Bagul
Date: 2018.01.29 17:08:06 +05'30'

(सो. ना. बागुल)

सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन,मुंबई.
२) प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सह सचिव, मुख्यसचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर.
६) संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
७) खाजगी सचिव, सर्व मंत्री / राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
८) सामान्य प्रशासन विभाग/का.२५, ३४, ३९, मंत्रालय, मुंबई.
९) सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक शाखा,नवीन प्रशासन भवन,५ वा मजला,मंत्रालयासमोर, मुंबई.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१२) सामान्य प्रशासन विभाग/का.२१ (रोख), मंत्रालय, मुंबई.
१३) वित्त विभाग/व्यय-४, मंत्रालय, मुंबई.
१४) निवड नस्ती, साप्रवि कार्यासन-२१, मंत्रालय, मुंबई.